# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः24.01.2025** **वारःशुक्रवार**

---

**ठळक बातम्या**

- नवी दिल्लीत प्रजासत्ताक दिन सोहळ्यात सहभागी होणारे एनसीसीचे छात्र, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, चित्ररथ कलाकार आदींशी पंतप्रधान नरेंद्र मोदी आज संवाद साधणार.
- प्रजासत्ताक दिन सोहळ्यासाठी इंडोनेशियाचे अध्यक्ष प्राबोवो सुबियांतो यांचं नवी दिल्लीत आगमन.
- दावोसमध्ये महाराष्ट्रासाठी विक्रमी 15 लाख 75 हजार कोटी रुपयांचे करार.
- उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज बिहार आणि उत्तरप्रदेशच्या दौऱ्यावर, तर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा महाराष्ट्र दौऱ्यावर.

आणि

- खेलो इंडिया  हिवाळी क्रीडा स्पर्धांना लेह-लडाखमधल्या नवांग डोरजी क्रीडा संकुलात सुरुवात

**पंतप्रधान संवाद**

नवी दिल्लीत प्रजासत्ताक दिन सोहळ्यात सहभागी होणारे राष्ट्रीय छात्र सेना म्हणजे एनसीसीचे छात्र, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, चित्ररथ कलाकार आदींशी पंतप्रधान नरेंद्र मोदी आज संवाद साधणार आहेत. पडद्याच्या मागे असणारे चित्ररथ कलाकार आणि एनसीसी छात्र यांच्याशी पंतप्रधान 7 लोककल्याण मार्ग या  निवासस्थानी संवाद साधतील.यंदा विविध राज्यं, केंद्रशासित प्रदेश आणि विविध केंद्रीय मंत्रालयांचे 31 चित्ररथ प्रजासत्ताक दिन सोहळ्यात सहभागी होणार आहेत. यंदा या सोहळ्याची स्वर्णिम भारत – वारसा आणि विकास अशी मध्यवर्ती संकल्पना आहे. राज्यघटनेच्या अमृतमहोत्सवानिमित्त दोन विशेष चित्ररथही असणार आहेत. भगवान बिरसा मुंडा, सरदार वल्लभभाई पटेल यांची दीडशेवी जयंती, तसंच हवामान विभागाचा दीडशेवा स्थापना दिन यांच्या निमित्तानंही चित्ररथ सादर होणार आहेत.

प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य संचलनाची कर्तव्य पथावर रंगीत तालीम पार पडली. प्रजासत्ताक दिनी राजधानीत होणाऱ्या मुख्य सोहळ्यात प्रजासत्ताक दिनाच्या राजधानीतील कर्तव्यपथावरील मुख्य सोहळ्यावेळी ध्वजारोहणानंतर महाराष्ट्राची कन्या फ्लाईंग ऑफिसर दामिनी देशमुख ध्वजावर

पुष्पवृष्टी करणार आहेत. बीड जिल्ह्याच्या वडवणी तालुक्यातील देवडी गावच्या दामिनी देशमुख वायुदलात फ्लाईंग ऑफिसर म्हणून कार्यरत आहेत.

**इंडोनेशिया अध्यक्ष**

दरम्यान, या सोहळ्यासाठी इंडोनेशियाचे अध्यक्ष प्राबोवो सुबियांतो यांचं काल रात्री  नवी दिल्लीत आगमन झालं. सुबियांतो यंदा प्रजासत्ताक दिन सोहळ्याचे मुख्य पाहुणे आहेत.  परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री पवित्र मार्गेरिटा यांनी त्यांचं विमानतळावर स्वागत केलं. आपल्या चार दिवसांच्या दौऱ्यात सुबियांतो राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेणार आहेत. राष्ट्रपती भवनात होणाऱ्या विशेष समारंभातही ते उपस्थित राहणार आहेत. सुबियांतो यांनी गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये सूत्रं हाती घेतल्यानंतरचा त्यांचा हा पहिलाच भारत दौरा आहे.

**दावोस मुख्यमंत्री**

दावोसमधल्या जागतिक आर्थिक परिषदेत महाराष्ट्रानं जगभरातील विविध दिग्गज कंपन्यासमवेत विक्रमी 15 लाख 75 हजार कोटी रुपयांचे गुंतवणूकीचे सामंजस्य करार केले आहेत; यातून राज्यात 15 लाख 98 हजार रोजगार निर्मिती होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्र्यांनी काल दावोसमधून दूरस्थ प्राणलीच्या माध्यमातून वार्ताहरांशी संवाद साधला. उद्योग मंत्री उदय सामंत मुंबईतून सहभागी झाले होते. दावोसमध्ये गुंतवणूकीचे 54 आणि धोरणात्मक सहकार्याचे 7 असे एकंदर 61 सामजंस्य करार केल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. महाराष्ट्र आता डेटा सेंटरची राजधानी होईल; असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**उपराष्ट्रपती**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड आज बिहार आणि उत्तरप्रदेशच्या दौऱ्यावर जात असून,बिहार मधल्या समस्तीपुर इथ भारतरत्न करपुरी ठाकूर यांच्या 101 व्या जयंतीच्या निमित्ताने आयोजित समारंभाला ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसच आज उत्तरप्रदेश चा स्थापना दिन आहे. त्यानिमित्त लखनौ इथ आयोजित विशेष समारंभाला ही उपराष्ट्रपती उपस्थित राहणार आहेत.

**अमित शाह**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा  आज महाराष्ट्र दौऱ्यावर येणार आहेत. मुंबईत होणाऱ्या एका कार्यक्रमात राष्ट्रीय नागरी सहकारी वित्त आणि विकास महामंडळाच्या कॉर्पोरेट कार्यालयाचं उद्घाटन शहा  यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी सहकारातून समृद्धीकडे या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या सहकार क्षेत्रासाठीच्या अनेक महत्वपूर्ण योजनांचा प्रारंभही शहा यांच्या हस्ते होणार आहे. आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष 2025 निमित्तानं वर्षभरात राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांच्या दिनदर्शिकेचं प्रकाशन आणि बहुउद्देशीय सहकारी संस्थांसाठीच्या प्रशिक्षण

कार्यक्रमाची सुरुवात शहा  यांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे. दरम्यान, आज दुपारी अमित शहा नाशिकला जाणार असून, दुपारी साडेबारा वाजता श्री क्षेत्र  त्र्यंबकेश्वर मंदिरात श्री त्र्यंबकराजाचं दर्शन आणि पूजन करणार आहेत. त्यानंतर मालेगाव तालुक्यातील अजंग गावात आयोजित सहकार परिषदेसह विविध कार्यक्रमांना ते उपस्थित राहणार आहेत.

**राष्ट्रीय शालेय बँड**

राष्ट्रीय शालेय बँड स्पर्धेची अंतिम फेरी आजपासून नवी दिल्लीत मेजर ध्यानचंद मैदानावर सुरू होणार आहे. उद्यापर्यंत ही स्पर्धा सुरू असणार आहे. शिक्षण विभागानं संरक्षण विभागाच्या सहकार्यानं ही स्पर्धा आयोजित केली आहे. तेरा राज्यांमधले सोळा संघ अंतिम फेरीत सहभागी होत आहेत.

**ट्रंप नाटो**

नाटो संघटनेच्या सदस्य देशांनी संरक्षणावर खर्च होणारी रक्कम आपल्या एकूण राष्ट्रीय उत्पादनापैकी म्हणजे जीडीपीपैकी पाच टक्क्यांपर्यंत वाढवावी असं आवाहन अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी केलं आहे. जागतिक संरक्षण खर्चाचा अनावश्यक भार अमेरिकेवर पडत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. ट्रंप दावोसमधल्या जागतिक आर्थिक परिषदेत बोलत होते. आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी अमेरिकेत उत्पादन केल्यास कर कमी केले जातील, असाही प्रस्ताव ट्रंप यांनी मांडला. कंपन्यांनी अमेरिकेत उत्पादन केलं नाही तर जास्त कर लादले जातील, असंही ते म्हणाले. सौदी अरेबिया आणि तेल उत्पादक संघटनेच्या देशांनी कच्च्या तेलाच्या किंमती कमी कराव्यात असंही आवाहन त्यांनी केलं. यामुळे रशिया-युक्रेन युद्ध लगेच संपेल असा दावा त्यांनी केला. दरम्यान, ट्रंप यांनी काल क्रिप्टोकरन्सी कार्यकारी संघटना स्थापन करण्याच्या आदेशावर स्वाक्षरी केली. डिजिटल ऍसेट धोरण, क्रिप्टोविषयक करार, बिटकॉइन गंगाजळी वाढवणं यासाठी क्रिप्टो सल्लागार मंडळ सल्ला देणार आहे.

**वक्थ विधेयक**

वक्फ सुधारणा विधेयकाबाबतच्या संयुक्त संसदीय समितीची बैठक आज आणि उद्या होणार असून, त्यात एकेक कलमांवर चर्चा होणार आहे. खासदार जगदंबिका पाल यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती काम करत असून, संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेवटच्या दिवशी ही समिती आपला अहवाल सादर करणं अपेक्षित आहे. सध्या काही सदस्य पाटणा, कोलकता आणि लखनौ दौऱ्यावर असून तिथं स्थानिक वक्फ मंडळांच्या आणि अल्पसंख्याक विभागाच्या प्रतिनिधींशी चर्चा केली जात आहे.

**हलवा सोहळा**

केंद्रीय अर्थ मंत्री निर्मला सीतारामन आज नवी दिल्लीत अर्थसंकल्पा निमित्त हलवा तयार करण्याच्या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत. येत्या एक फेब्रुवारीला संसदेत केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे, या अर्थसंकल्पाच्या तयारीचा अखेरचा टप्पा म्हणून हलवा सोहळा दरवर्षी आयोजित केला जातो. केंद्रीय वित्त राज्य मंत्री पंकज चौधरी तसंच वित्त मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत.

**कुंभमेळा**

प्रयागराजमधील कुंभमेळ्यात आत्तापर्यंत दहा कोटी 21 लाख भाविकांनी पवित्र स्नान केलं आहे. या महिन्यात तेरा तारखेला सुरू झालेला हा कुंभमेळा 26 फेब्रुवारीपर्यंत सुरू राहणार आहे. कुंभमेळ्यात सहभागी होणाऱ्या भाविकांची संख्या 45 कोटींपर्यंत जाण्याचा अंदाज आहे.

**खेलो इंडिया**

केंद्रसरकारच्या खेलो इंडिया  हिवाळी क्रीडा स्पर्धांना काल लेह -लडाख इथल्या नवांग डोरजी क्रीडा संकुल इथ सुरुवात झाली. 27 जानेवारीपर्यंत होणाऱ्या या क्रीडा स्पर्धांच्या पहिल्या टप्प्यात मुख्यतः बर्फावर खेळल्या जाणाऱ्या आईस हॉकी आणि स्केटिंग याच्या स्पर्धा होणार आहेत. दुसऱ्या टप्प्यात 22 ते 25 फेब्रुवारी दरम्यान जम्मू काश्मीर इथ 4 प्रकारच्या  बर्फातील क्रीडा प्रकारांच्या स्पर्धा होणार आहेत यामध्ये देशातील विविध राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या 19 पथकातील 4 शे हून अधिक खेळाडू सहभागी होणार आहेत.

**टाटा स्टील**

टाटा स्टील बुद्धिबळ स्पर्धेची सहावी फेरी आजपासून नेदरलँड्समध्ये सुरू होणार आहे. या फेरीत भारताच्या अर्जुन एरिगायसीचा सामना फाबियानोशी, डी. गुकेशचा सामना उझबेकीस्तानच्या नॉर्डिरबेक अब्दुलसत्तोरोवशी, तर आर. प्रज्ञानंदचा सामना चीनच्या यी वेईशी होणार आहे. प्रज्ञानंद सध्या या स्पर्धेत गुणतालिकेत पहिल्या क्रमांकावर आहे. डी. गुकेश तिसऱ्या क्रमांकावर, तर हरिकृष्ण पेंटला पाचव्या क्रमांकावर आहे.

क्रिकेट

क्रिकेटमध्ये भारत आणि इंग्लंड यांच्या संघांमध्ये उद्या वीस षटकांचा सामना होणार आहे. चेन्नईच्या एम. ए. चिदंबरम मैदानावर संध्याकाळी सात वाजता हा सामना होईल.  सूर्यकुमार यादव याच्या नेतृत्वाखालचा भारताचा संघ पाच सामन्यांच्या मालिकेत एक-शून्य असा आघाडीवर आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार**.